| | |
|---|---|
| [QR] | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.१५१/२०१३ मधील</u>**<br>**<u>अर्ज निशाणी क्र.६५ खालील आदेश</u>**<br>**<u>(CNR No. MHWS050000112009)</u>** |

**१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१–अ ते १–क यांच्या तर्फे मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर यांच्या रिट पिटीशन नं. ४५८०/२०२४ मधील दिनांक २०.६.२०२५ रोजीच्या आदेशाची ऑनलाईन प्रत आणि नियमित दरखास्त १/२००७ मधील अर्ज/हरकत निशाणी क्र. २९३ व त्यावरील दिनांक १६.३.२०२४ रोजीच्या आदेशाची सत्यप्रत दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

**२.** प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास वादी यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. प्रतिवादी क्र.१–अ ते १–क यांच्यातर्फे विधिज्ञ श्री. पी.आर. बंग यांचा आणि वादींतर्फे विधीज्ञ श्री. राजेश प्रधान यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.१–अ ते १–क तर्फे दाखल करु इच्छित असलेल्या मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर यांच्या रिट पिटीशन नं. ४५८०/२०२४ मधील दिनांक २०.६.२०२५ रोजीच्या आदेशाची ऑनलाईन प्रत आणि नियमित दरखास्त १/२००७ मधील अर्ज/हरकत निशाणी क्र. २९३ व त्यावरील दिनांक १६.३.२०२४ रोजीच्या आदेशाची सत्यप्रत अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | ..अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :–**

**३.** प्रतिवादी १–अ ते १–क यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या दाव्यात वादींतर्फे साक्षीदार क्र. १ म्हणून बबन ग्यानुजी गवई यांचे पुराव्यावचे शपथपत्र निशाणी क्र. ६१ अन्वये दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१–अ ते १–क हे मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर यांच्या रिट पिटीशन नं. ४५८०/२०२४ मधील दिनांक २०.६.२०२५ रोजीच्या आदेशाची ऑनलाईन प्रत आणि नियमित दरखास्त १/२००७ मधील अर्ज/हरकत निशाणी क्र. २९३ व त्यावरील दिनांक १६.३.२०२४ रोजीच्या

आदेशाची सत्यप्रत दाखल करु इच्छीत आहेत. त्यामुळे त्या प्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

**४.** याउलट वादी यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १–अ ते १–क यांनी ती कागदपत्रे खूप उशीराने दाखल केलेली आहेत. त्यामुळे ते दस्त दाखल करण्यासाठी वादीची हरकत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १–अ ते १–क यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, या दाव्यात तत्कालीन न्यायिक अधिकारी यांनी निशाणी क्र. १५ अन्वये मुद्दे काढलेले आहेत. त्यानंतर वादी क्र. १ यांनी निशाणी क्र. ६१ अन्वये त्यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे आणि प्रस्तुतचा दावा वादीचा पुढील सरतपास व उलटतपास नोंदविणेसाठी प्रलंबीत आहे. प्रतिवादी क्र. १–अ ते १–क हे मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर यांच्या रिट पिटीशन नं. ४५८०/२०२४ मधील दिनांक २०.६.२०२५ रोजीच्या आदेशाची ऑनलाईन प्रत आणि नियमित दरखास्त १/२००७ मधील अर्ज/हरकत निशाणी क्र. २९३ व त्यावरील दिनांक १६.३.२०२४ रोजीच्या आदेशाची सत्यप्रत दाखल करु इच्छीत आहेत. या परिस्थीतीत ही प्रकरणे वादी बबन गवई आणि मयत प्रतिवादी सरस्वती अग्रवाल यांच्याशी संबंधीत आहेत. त्यामुळे त्या सत्यप्रती अभिलेखावर आल्या तर प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली काढण्यास ते दस्त उपयुक्त ठरु शकतात. त्यामुळे त्या प्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि प्रतिवादी क्र. १–अ ते १–क यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.६५ मंजुर करण्यात येत आहे आणि प्रतिवादी क्र. १-अ ते १-क त्या प्रती दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.01.16 17:05:40 +0530

स्थळ : मंगरुळपीर — ( ध. भ. हंबीरे )
दिनांक : १६.१.२०२६ — दिवाणी न्यायाधीश व. स्तर, मंगरुळपीर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :-Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 16.1.2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 16.1.2026 |
| 5) | Order uploaded on | :- 16.1.2026 |